दै. "अॅग्रोवन" दि. ०७/०७/२०२१.

# राज्याचीही स्वतंत्र कृषी विधेयके

## विधिमंडळात मसुदे सादर; दोन महिन्यांत मागविल्या सूचना

सकाळ न्यूज नेटवर्क




मुंबई : केंद्र सरकारने सप्टेंबर २०२० मध्ये संसदेत मंजूर केलेल्या तीन नव्या कृषी कायद्यांना देशभरातून सध्या विरोध होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र कृषी कायदे करण्याच्या उद्देशाने महाविकास आघाडी सरकारने मंगळवारी (ता. ६) विधिमंडळात तीन स्वतंत्र विधेयके सादर केली. या विधेयकांच्या मसुद्यांवर जनता, शेतकरी, सामाजिक संस्था आणि संघटनांच्या सूचना मागविण्यात आल्या आहेत, यानंतर आलेल्या सूचनांचा विचार करून अंतिम प्रारूप विधिमंडळात चर्चेसाठी मांडण्यात येणार आहे. पान ४ वर »

### अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियमातील तरतुदी

जीवनावश्यक वस्तूंची यादी तयार करणे, साठेबाजीवर नियंत्रण या बाबी, आता केंद्राच्या जोडीने राज्य सरकारच्या अखत्यारित असतील.

### शेतकऱ्यांचे उत्पादन व्यापार आणि व्यवहार (प्रोत्साहन आणि सुविधा) अधिनियमातील तरतुदी

- राज्यात कोठेही शेतीमालाचा व्यापार करण्यासाठी किंवा शेतीमालाची खरेदी विक्री करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडून परवाना घेणे बंधनकारक असेल.
- व्यापारी परवानाधारक असल्यामुळे सक्षम प्राधिकरणासमोर दाद मागता येईल.
- कराराच्या अटीनुसार शेतकऱ्याला देय असलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत व्यापाऱ्याने शेतकऱ्याचा व्यवहार पूर्ण केला नाही, तर तो शेतकऱ्यांचा छळ समजला जाईल व त्यास तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा पाच लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा सुनावण्यात येतील.

### शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) आश्वासीत किंमत आणि शेती सेवा करार अधिनियमातील तरतुदी

- शेतमालाच्या व्यवहाराची किंमत किमान आधारभूत किमती इतकी किंवा त्यापेक्षा जास्त असल्याशिवाय खरेदी-विक्रीचा करार किंवा व्यवहार कायदेशीर समजला जाणार नाही.
- शेतकरी व करार करणारा यांच्यातील वाद सोडविण्यासाठी ते सक्षम प्राधिकरणाकडे, अधिकाऱ्याकडे किंवा संस्थेकडे जाऊ शकतात. हा वाद ३० दिवसांत सोडवणे बंधनकारक राहील.
- विवादित करार कायद्यानुसार नसेल तर सक्षम प्राधिकरण शेतकऱ्याच्या विरोधात निकाल देऊ शकणार नाही.
- सक्षम प्राधिकरण, अधिकारी किंवा संस्था यांच्या निकालाला दिवाणी न्यायालयाच्या निकालाचे वजन असेल.
- त्यांच्या निकालाने शेतकऱ्याचे समाधान झाले नाही तर शेतकरी राज्य कायद्याच्या तरतुदी सोबतच, दिवाणी न्यायालय व इतर उपलब्ध कायदेशीर पर्यायांचा अवलंब करू शकतो.

# राज्याचीही स्वतंत्र कृषी विधेयके

» पान १ वरून

दरम्यान, संपूर्ण कृषी कायदेचे मागे घ्या असा आग्रह संयुक्त किसान मोर्चाने केलेला आहे. गेल्या सात महिन्यांपासून ते देशभर आंदोलन करत आहेत. यापार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील स्वतंत्र विधेयकांबाबत राज्यातील शेतकरी, शेतकरी संघटना आणि नेते यांच्या भूमिकांकडे लक्ष लागले आहे.

विधानसभेत केंद्र सरकारच्या नव्या कृषी कायद्यातील तरतुदीत सुधारणा करण्यासाठीचे 'शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण आश्वासित किंमत आणि शेतीसेवाविषयक करार) महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२१चा मसुदा कृषिमंत्री दादा भुसे यांनी, तर अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी 'जीवनावश्यक वस्तू सुधारणा अधिनियम २०२१', तसेच सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी उत्पादनाचे व्यापार आणि व्यवहार (प्रोत्साहन आणि सुविधा) अधिनियम २०२१अशी तीन विधेयके मंगळवारी (विधानसभेत) सादर केली. या तीन विधेयकांचे मसुदे दोन महिना इतक्या कालावधीसाठी या राज्यातील जनता, शेतकरी, सामाजिक संस्था आणि संघटना यांच्या सूचना, संदर्भ यासाठी खुले ठेवले जाणार आहे. त्यानंतर पुढील अधिवेशनात चर्चेला येणार आहेत.

केंद्र सरकारने कृषी विधेयक आणले आहे. याविरोधात देशभरातून शेतकऱ्यांचा विरोध होत आहे.शेतकरी आंदोलन सुरू आहे. याविधेयका विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितल्यानंतर न्यायालयाने या विधेयकास स्थगिती दिली आहे. या कायद्यातील जाचक अटींविरोधात सुधारणा करण्यासाठी ही तीन विधेयके या अधिवेशनात घाइघाईने मांडली आहेत.

या विधेयकाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना केली होती. या समितीने सखोल अभ्यास आणि चर्चा करून तीन नवीन कृषी सुधारणा विधेयके तयार केली आहेत.

याविषयी बोलताना महसूलमंत्री श्री. थोरात म्हणाले, ''केंद्र सरकारने आणलेले तीन काळे कृषी कायदे हे शेतकऱ्यांच्या नाही तर फक्त मूठभर मोठ्या उद्योगपतींच्या फायद्याचे आहेत. या कायद्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे. वास्तविक पाहता कृषीसंबंधी कायदे हा राज्यांचा विषय असून केंद्र सरकारने त्यावर अतिक्रमण केले आहे. विधेयकांचा मसुदा राज्यातील जनतेच्या व शेतकऱ्यांच्या विचारार्थ ठेवण्यात येणार असून, दोन महिने त्यावर शेतकरी आणि सामाजिक संस्था आणि संघटनाच्या सूचना विचारात घेऊन त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.''

मंत्री थोरात म्हणाले, की केंद्रातील भाजप सरकारने घाईघाईने लादलेल्या तीन कृषी कायद्यात किमान हमी भावाचे (एमएसपी) प्रावधानच नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल कवडीमोल भावाने विकला जाऊन यातून फायदा व्यापाऱ्यांचा होणार आहे. शेतकऱ्यांच्या हक्काची असलेल्या बाजार समित्यांच्या (कृषी उत्पन्न बाजार समित्या - एपीएमसी) अस्तित्वावरही घाला येणार आहे. कंत्राटी शेतीमुळे नवीन जमीनदारी पद्धतीला चालना मिळण्याचा धोका अधिक आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. हे शेतकरी व्यापारी व उद्योगपतींच्या समोर तग धरू शकणार नाहीत. शेतकरी भांडवलदारांच्या हातचा गुलाम बनेल. यातून शेती व शेतकरी देशोधडीला लागण्याचा धोका मोठा आहे. केंद्राच्या कृषी कायद्यांमुळे फक्त शेतकऱ्यांचेच नुकसान होणार नाही तर साठेबाजीला मोकळे रान मिळाल्यामुळे महागाई वाढून सामान्य लोकांना त्याचा फटका बसणार आहे. हे सर्व लक्षात घेऊनच महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत नविन कृषी सुधारणा विधेयक विधानसभेत मांडले आहे.

विधानसभेत अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. भुजबळ यांनी जीवनावश्यक वस्तू सुधारणा अधिनियम २०२१ हे विधेयक सादर केले. तर शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण आश्वासित किंमत आणि शेतीसेवा विषयक करार महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२१) कृषिमंत्री श्री. भुसे यांनी आणि शेतकरी उत्पादनाचे व्यापार आणि व्यवहार (प्रोत्साहन आणि सुविधा) अधिनियम २०२१ हे विधेयक सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी सादर केले.

दै. "ॲग्रोवन" दि. ८/७/२०२१.

# 'शेतीमाल तारण योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा'

ॲग्रोवन वृत्तसेवा

कऱ्हाड, जि. सातारा : शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती महादेव देसाई, उपसभापती विजयकुमार कदम यांनी केले आहे.

शेतीमालास जास्त बाजारभाव मिळण्यासाठी कऱ्हाड शेती उत्पन्न बाजार समितीने २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून शेतीमाल तारण कर्ज योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये शासकीय धोरणानुसार ७० टक्के रक्कम सहा टक्के व्याजदराने बाजार समितीच्या स्वनिधीतून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिली जाते. स्थानिक पातळीवर शेतमाल साठवणुकीची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने आणि पैशांच्या गरजेपोटी शेतकरी सुगीनंतर लगेचच शेतीमाल विकतात. त्याच दरम्यान एकाच प्रकारचा शेतीमाल मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आणला जातो. त्यामुळे दर गडगडतात. योग्य भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. काढणी हंगामात शेतीमालाची साठवणूक करून काही कालावधीनंतर तो बाजारपेठेत विक्रीसाठी आणल्यास जादा भाव मिळू शकतो. शेतकऱ्यांना सुगीच्या काळात असलेली आर्थिक निकड लक्षात घेऊन गरजेच्या वेळी आर्थिक साह्य उपलब्ध करून देण्यासाठी बाजार समितीतर्फे शेतमाल तारण कर्जयोजना राबवण्यात येत आहे.

दै. "अॅग्रोवन" दि. ८/७/२०२१.

# केंद्राकडून सहकारासाठी स्वतंत्र मंत्रालयाची निर्मिती

**सकाळ न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** मंत्रिमंडळातील फेरबदल आणि विस्ताराअगोदर मोदी सरकारने सहकार मंत्रालयाची निर्मिती केली आहे. सहकारातून समृद्धीचे स्वप्न साकार करण्यासाठी हे ऐतिहासिक पाऊल असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. मंत्रिमंडळ विस्तारात नव्या मंत्रालयाची जबाबदारी कोणाला मिळेल याबाबत उत्सुकता आहे.

आतापर्यंत सहकार विभाग हा कृषी मंत्रालयाच्या अखत्यारीत येणारा विभाग राहिला आहे. मात्र आता केंद्र सरकारच्या नव्या निर्णयामुळे सहकार हे स्वतंत्र मंत्रालय असेल. नवे मंत्रालय स्थापण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयानंतर मंत्रिमंडळ सचिवालयातर्फे औपचारिक घोषणा करण्यात आली. यापूर्वी मोदी सरकारने कृषी तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालयाची नावे बदलून अनुक्रमे कृषी व शेतकरी कल्याण आणि शिक्षण मंत्रालय अशी केली होती. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने समुदाय आधारित विकासात्मक भागीदारीसाठी आपली कटिबद्धता यातून दर्शविली आहे. सहकारासाठी स्वतंत्र मंत्रालय अर्थमंत्र्यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय घोषणेला अनुरूप आहे, असे मंत्रिमंडळ सचिवालयाने म्हटले आहे.

सरकारच्या म्हणण्यानुसार, नव्याने अस्तित्वात येणारे सहकार मंत्रालय देशातील सहकार चळवळीला मजबूत करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय, कायदेशीर आणि धोरणात्मक रचना तयार करेल. तसेच सहकारी संस्थांना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविणाऱ्या जनभागीदारी आधारित चळवळीला बळकट करण्यासाठी मदत करेल, असे मंत्रिमंडळ सचिवालयाच्या निवेदनात म्हटले आहे. देशात सहकारावर आधारित आर्थिक विकास मॉडल प्रासंगिक असून, त्यात प्रत्येक सदस्य आपली जबाबदारी ओळखून काम करत असतो. नवे मंत्रालय सहकारी संस्थांच्या कारभारात सुटसुटीतपणा आणण्यासाठी तसेच आंतरराज्यीय सहकारी संस्थांच्या (एमएससीएस) विकासासाठी कार्य करेल.

या माध्यमातून सहकार चळवळीची कशी भरभराट करण्यात येणार याकडे मात्र सर्वांचे लक्ष लागले आहे.

देशोन्नती एक्सक्लूझिव्ह अपडेट

# शहरात राबविला जाणार मॅग्रेट प्रकल्प

## उत्पादक ते ग्राहक अशी साखळी निर्माण करणार

देशोन्नती वृत्तसंकलन...

नागपूर ■ राज्यातील कृषी, हवामान विभागनिहाय फळे, भाजीपाला व कृषी उत्पादनावर प्रक्रियेसह विपणन व निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी मूल्य साखळयांमध्ये खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र अग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्रेट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प विकास बँकेच्या आर्थिक सहकार्याने राबविण्यात येत असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २५ शेतकरी, उत्पादक कंपन्या व ५ मूल्य साखळी गुंतवणूकदारांची निवड केली जाणार आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत करण्यात येणार आहे.

विभागातील डाळिंब, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, भेंडी व मिरची (हिरवी व लाल) व फूलपिके आदी फलोत्पादन पिकांसाठी उत्पादन ते ग्राहक अशी एकात्मिक मूल्य साखळयांच्या विकासासाठी या प्रकल्पाची आखणी केली आहे. यात सध्या अस्तित्वात असलेल्या व नव्याने होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, निर्यातदार, प्रक्रियादार, संघटित किरकोळ विक्रेते, कृषी व्यवसाय करणारे लघु व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहायता समूह यांचा सहभाग घेण्यात येणार आहे. हा प्रकल्प १४२.९ दक्षलक्ष अमेरिकन डॉलरचा असून, या प्रकल्पाचा कालावधी ६ वर्षांचा म्हणजे सन २०२६-२७ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

प्रकल्पाचा उद्देश साध्य करण्यासाठी कृषिविषयक काढणीपश्चात हाताळणी व व्यवस्थापन, मूल्यवृध्दी, प्राथमिक, दुय्यम प्रक्रिया, विपणन आदी विविध बाबींशी निगडित शेतकरी उत्पादक संस्था व मूल्य साखळी गुंतवणूकदार या लाभार्थ्यांच्या उपप्रकल्पांना जास्तीत जास्त ६० टक्क्यांपर्यंत अर्थसाहाय्य देय राहणार आहे. तसेच, इच्छुक उपप्रकल्पांना फायनान्शिअल इंटरमिडेशन लोन (एफआयएल) या उपघटकांतर्गत भागीदार वित्तीय संस्थाद्वारे खेळते भांडवल व मध्यम मुदत कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यातून प्रकल्पांतर्गत उत्पादक व उद्योजकांना नवीन व संघटित बाजारपेठेत प्रवेश मिळवणे सोपे होईल.

### १३ जुलैपर्यंत अर्ज करण्यास मुदत

नागपूर विभागातील प्रामुख्याने संत्रा, मोसंबी, भेंडी, हिरवी व लाल मिरची या पिकामध्ये काम करणाऱ्या जास्तीत जास्त लाभार्थींनी सहभाग नोंदवून योजनेचा फायदा घ्यावा व संबंधितांनी अर्ज ऑनलाईन नोंद करून, प्रत्यक्ष स्वरूपात परिपूर्ण प्रस्ताव २ प्रतीत महाराष्ट्र राज्य कृषी पण लाल मिरची या पिकामध्ये काम करणाऱ्या जास्तीत जास्त लाभार्थींनी सहभाग नोंदवून योजनेचा फायदा घ्यावा व संबंधितांनी अर्ज ऑनलाईन नोंद करून, प्रत्यक्ष स्वरूपात परिपूर्ण प्रस्ताव २ प्रतीत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय, नवीन कॉटन मार्केट यार्ड, शेतकरी भवनच्या मागे एस.टी. बस स्टँड गणेशपेठ येथे सादर करावा, असे आवाहन प्रकल्प अंमलबजावणी कक्ष प्रमुख व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक राजेश सरोदे यांनी केले आहे. यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १३ जुलै असून, अर्जाचा नमुना महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या डब्लूडब्लूडब्लू.एमएसएएमबी.कॉम या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ePaper देशोन्नती Sun, 11 July 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/61752847

दै. देशोन्नती दि. 11/07/2021

दै. "ॲग्रोवन" दि. २३/७/२०२१.

# उपलब्धतेअभावी केळी निर्यात मंदावली

## दर्जेदार केळीसाठी निर्यातदारांची धावाधाव

राजकुमार चौगुले : ॲग्रोवन वृत्तसेवा

**कोल्हापूर :** यंदा केळीला परदेशातून मागणी असूनही केळीची कमी उपलब्धता, पावसाळी हवामानामुळे वाढलेले रोगाचे प्रमाण याचा परिणाम निर्यातक्षम केळीवर होत आहे. ज्या निर्यातदारांचे दररोज एक ते दोन कंटेनर पाठवले जायचे त्यांचा आता आठवड्यातून एखाद-दुसरा कंटेनर जात असल्याचे चित्र आहे. अगदी जळगावसारख्या केळी उत्पादक पट्ट्यात ही निर्यातदारांना अपेक्षित केळी मिळत नसल्याचे चित्र आहे. यामुळे सध्यातरी मागणी असूनही निर्यात करणे शक्य होत नसल्याचे जाणकारांनी म्हटले आहे.

केळीच्या उत्पादनात भारत जगात आघाडीवर असून एकूण जागतिक उत्पादनात भारताचा वाटा २५ टक्के आहे. केळीच्या उत्पादनांमध्ये आंध्र प्रदेश, गुजरात, तमिळनाडू, महाराष्ट्र, केरळ, उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश ही आघाडीची राज्ये आहेत.

भारतीय केळीला इराक, इराण आणि अफगाणिस्तान आदी आखाती देशांमधून मोठी मागणी असते. गेल्या वर्षी कोरोनामुळे बिकट स्थिती निर्माण झाली. केळीचा भाव क्विंटलला ३०० रुपयांपर्यंत घसरला. या धक्क्यामुळे राज्यभरातील केळी उत्पादकांना नुकसान सोसावे लागेल. अनेकांना केळी विक्री कुठे करायची, असा प्रश्न पडला. याचा परिणाम यंदाच्या केळी लागवडीवर झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कापणीसाठी केळीची उपलब्धता कमी आहे. यामुळे गेल्या महिन्यापासून दरात चांगलीच वाढ झाली आहे. येथून पुढच्या काळात ही सणासुदीचे दिवस असल्याने केळीचे दर वाढूनच राहतील अशी शक्यता आहे.

सध्या केळीला स्थानिक बाजारपेठेत क्विंटलला ११०० रुपयांपर्यंत दर मिळत आहे. निर्यातीसाठीची केळीची खरेदी १४०० रुपयापर्यंत होत आहे.

### निर्यातीचे प्रमाण वाढतेच

सध्या निर्यात कमी होत असली तरी गेल्या दोन वर्षांचा आढावा घेतल्यास भारतातून परदेशात होणाऱ्या निर्यातीचे प्रमाण हे वाढतच असल्याचे चित्र आहे. २०१८-१९ मध्ये १.३४ लाख टन केळीची निर्यात विविध देशात झाली होती. २०१९-२० मध्ये यात वाढ होऊन ही निर्यात १.९५ लाख टनांवर पोहोचली. एप्रिल २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीत भारतातून १.९१ लाख टन केळी निर्यात झाली. सध्या ज्या भागात नियमित केळी असतात तिथे अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी निर्यातदारांकडून काही नवीन पॉकेटचा ही शोध घेण्यात येत आहे. यामुळे केळीच्या निर्यातीत वाढ होईल, अशी शक्यता व्यापारी सूत्रांची आहे.

> **गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दर्जेदार केळी उपलब्ध करणे आम्हाला आव्हान ठरत आहे. यामुळे अतिशय कमी प्रमाणात निर्यात सुरू आहे. एक तर केळीची उपलब्धता नाही आणि दुसरीकडे निर्यातक्षम दर्जाच्या केळी मिळणेही दुरापास्त झाले आहे. यामुळे सध्या तरी अगदी नाममात्र निर्यात सुरू आहे.**
>
> – चेतन पाटील, केळी निर्यातदार

दै. "अग्रोवन" दि. १३।०१।२०२१. ४



गोविंद हांडे

# 'भौगोलिक चिन्हांकन' नोंदणीकृत शेतीमालासाठी फायदेशीर

**जागतिक बाजारपेठांमध्ये भौगोलिक चिन्हांकन मानांकित उत्पादनांच्या निर्यातीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यातील एकूण २० वैविध्यपूर्ण फळे व भाजीपाला पिकांकरिता भौगोलिक चिन्हांकन दर्जा प्राप्त झाला आहे.**

भाग १



भौगोलिक चिन्हांकन ही एक प्रकारची मानांकन नोंद आहे. ही नोंद भौगोलिक क्षेत्राशी निगडित आहे. नैसर्गिकरीत्या व मानवी प्रयत्नातून उत्पादित होणाऱ्या शेतीमालाची ओळख, गुणवत्तेतील सातत्य आणि त्यांच्यामधील विशेष गुणधर्माचे जतन करण्यासाठी हे चिन्हांकन उपयुक्त आहे. भौगोलिक चिन्हांकन प्राप्त फलोत्पादन पिकांना ब्रँडिंगद्वारे विक्री व निर्यातीकरिता अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी आवश्यक आहे. कृषी विषयाचा १९९५ मध्ये प्रथमच जागतिक व्यापार करारामध्ये समावेश करण्यात आला. या तरतुदीमुळे शेतीमालासाठी जागतिक बाजारपेठ खुली झाली.

जागतिक व्यापार संघटनेमार्फत जागतिक व्यापार कराराअंतर्गत विविध करार करण्यात आले, त्यातील महत्त्वाचा करार म्हणजे 'व्यापार संबंधित बौद्धिक मालमत्ता अधिकार'. हा करार उत्पादनाचे पेटंट डिझाईन, त्याचे भौगोलिक चिन्हांकन व ट्रेडमार्क नोंदणी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या करारानुसार भौगोलिक क्षेत्राशी निगडित उत्पादित शेतीमालास संरक्षण देण्यासाठी भारतीय संसदेकडून ३० डिसेंबर, १९९१ रोजी 'भौगोलिक प्रदर्शन नोंदणी व संरक्षण अधिनियम १९९९' संमत करण्यात आला. या कायद्याअंतर्गत 'बौद्धिक संपदा हक्क' म्हणून शेतीमालाकरिता भौगोलिक चिन्हांकन नोंदणी करण्याचे काम केंद्र शासनाच्या चेन्नई येथील जिऑग्राफिकल इंडिकेशन नोंदणी कार्यालयामार्फत केले जाते. या कायद्याअंतर्गत उत्पादनाची नोंदणी करण्याकरिता एकूण चौतीस प्रकारची वर्गवारी तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये कृषी व फलोत्पादन पिकांचा समावेश आहे. जागतिक बाजारपेठांमध्ये भौगोलिक चिन्हांकन मानांकित उत्पादनांच्या निर्यातीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## भौगोलिक चिन्हांकनाचे महत्त्व

- ही भौगोलिक क्षेत्राशी निगडित एक प्रकारची मानांकन नोंद आहे.
- नैसर्गिकरित्या व मानवी प्रयत्नातून उत्पादित होणाऱ्या शेतीमालाच्या ओळखीद्वारे त्याची खास गुणवत्ता,गुणवत्तेतील सातत्य, त्यांच्यामार्फत विशेष गुणधर्माचे जतन आणि विक्री करण्यासाठी हे चिन्हांकन उपयुक्त आहे.
- भौगोलिक मानांकन हा सामुदायिक हक्क आहे. जेव्हा एखादा शेतकरी समूह एखाद्या पिकाची लागवड करतो किंवा एखादा पदार्थ बनवतो तेव्हा त्याला तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार काही गुणधर्म, वैशिष्ट्ये मिळालेली असतात. त्यामुळे त्या पिकांची किंवा उत्पादनाची विशेष गुणवत्ता निर्माण होते.तेथील हवामान,माती आणि पाणी याचा त्या उत्पादनावर परिणाम झालेला असतो. त्यामुळे या उत्पादनाला एक वैशिष्ट्य प्राप्त होते. या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनाची बौद्धिक संपत्ती म्हणून भौगोलिक प्रदर्शन नोंदणी व संरक्षण अधिनियम १९९९ या कायद्याखाली नोंदणी करून त्याला संरक्षण देणे,हा भौगोलिक चिन्हांकन नोंदणीचा मुख्य हेतू आहे.

## नोंदणीचे फायदे

- भौगोलिक क्षेत्राशी निगडित पिकास कायदेशीर संरक्षण.
- भौगोलिक चिन्हांकन कायद्याखाली नोंदणी केल्याने त्याच्या अनधिकृत विक्रीस प्रतिबंध.
- भौगोलिक चिन्हांकन शेतीमालास निर्यातीसाठी अधिक संधी उपलब्ध होते. नोंदणी केल्याने शेतीमालास राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्रँड होण्यास मदत.
- व्यापारी चिन्हाला बाजारपेठेत जे महत्त्व असते तेच महत्त्व शेतीमालाच्या भौगोलिक चिन्हांकनाला असते. त्यामुळे नोंदणी केलेल्या उत्पादकाला जास्तीचे आर्थिक उत्पन्न.

## चिन्हांकन नोंदणीसाठी अर्ज

- कोणताही नोंदणीकृत व्यक्ती समूह किंवा उत्पादन उत्पादक संघटना त्या उत्पादनाच्या प्रक्रियेशी संबंधित असेल, तेच नामांकन नोंदणीसाठी अर्ज करू शकतात.
- संबंधित कार्यक्षेत्रात उत्पादित होणाऱ्या सर्व शेतीमालासाठी याचा फायदा घेता येतो, कारण सदरची बौद्धिक संपदा ही सामूहिक हक्काची असते. याची वैयक्तिक स्वरूपात नोंदणी करता येत नाही. अर्जदार संस्था कोणीही असली तरी त्या पिकाच्या भौगोलिक क्षेत्रांमधील इतर शेतकऱ्यांना सुद्धा या नोंदणीचा अधिकृत वापरकर्ता म्हणून फायदा घेता येतो.
- नोंदणी दहा वर्षाकरिता असते. दर दहा वर्षांनी पुढील कालावधीकरिता नूतनीकरण करावे लागते. फक्त नोंदणी करून उपयोग होणार नाही तर नोंदणीनंतर संबंधित मालाच्या गुणवत्तेमध्ये सातत्य राखणे, बिगर सभासद शेतकऱ्यांना याचा लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही आवश्यक.
- शेतीमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये गुणवत्तापूर्ण ब्रँड म्हणून विकसित करणे हे महत्त्वाचे काम यापुढे अर्जदार संस्थेने करावयाचे आहे.

## अधिकृत वापरासाठी नोंदणीची पद्धत

- भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालयामार्फत ज्या पिकांना भौगोलिक चिन्हांकनाचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्या पिकाच्या भौगोलिक क्षेत्रातील संबंधित पीक उत्पादकांना अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करता येते.

## नोंदणीकरिता कागदपत्रांची पूर्तता

- भौगोलिक चिन्हांकित पिकाकरिता अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करण्याकरिता GI- ३A मध्ये अर्ज करणे आवश्यक.
- अर्जासोबत सातबाराची स्वयं साक्षांकित प्रत, सदर पिकाची ट्रेसेब्लिटी नेट अंतर्गत नोंदणी केली असल्यास प्रत.
- भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत कार्यक्षेत्रातील पिकाचे उत्पादक असल्याचे व त्या दर्जाचे उत्पादन करण्यात असल्याबाबतचे शेतकऱ्याचे हमीपत्र.
- संस्थेच्या नावाने ज्या पिकाकरिता भौगोलिक चिन्हांकन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे, त्या संस्थेचे संबंधित शेतकऱ्यांच्या नावाने अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करण्याकरिता शिफारस पत्र.
- अधिकृत वापराकरिता नोंदणी करण्यासाठी निर्धारित केलेली फी डीडी किंवा चेक द्वारे रजिस्टर, जिओग्राफिकल इंडिकेशन, चेन्नई यांच्या नावे भरणे आवश्यक.

## नोंदणी अर्जात भरावयाचा तपशील

- ज्या शेतकऱ्यांच्या नावाने अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करावयाची आहे, त्या शेतकऱ्याचे पूर्ण नाव.
- अर्जकर्त्या शेतकऱ्याचा पूर्ण पत्ता.
- ज्या पिकाकरिता अधिकृत वापर करता म्हणून नोंदणी करावयाची आहे त्या पिकाचे भौगोलिक मानांकन प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक.
- अर्ककर्त्याचा ई-मेल.
- अर्जकर्त्याचा फोन नंबर किंवा मोबाईल नंबर.

## अर्जात द्यावयाची माहिती

- भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत संस्थेचे नाव व मानपत्र क्रमांक. पिकाचे उत्पादन व गुणवत्तेबाबत हमी.
- सदर अर्जासोबत दिलेली माहिती खरी असल्याबाबतची हमी.
- माझ्या चुकीच्या माहितीमुळे अर्ज रद्द झाला किंवा मला मिळालेल्या अधिकृत वापर करता प्रमाणपत्र चुकीच्या माहिती बाबत रद्द झाल्यास माझी काही तक्रार राहणार नाही.
- दिनांक, ठिकाण, अर्ज कर्त्याची स्वाक्षरी,इत्यादी तपशील अधिकृत वापरासाठी नोंदणी करण्याकरिता विहित केलेल्या अर्जामध्ये संबंधित शेतकऱ्यांनी माहिती देणे आवश्यक आहे.

- गोविंद हांडे,
९४२३५७५९५६
(तांत्रिक सल्लागार (निर्यात) महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, कृषी आयुक्तालय, पुणे)

### राज्यातील भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत पिके

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनमध्ये अग्रेसर आहे. राज्यातील विविध भागांमध्ये उत्कृष्ट दर्जाची फळे व भाजीपाला उत्पादन होते. विविध फळे, भाजीपाला यांची ओळख त्याच्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण बाबी करिता प्रसिद्ध आहे. पिकांच्या गुणवत्तेस हमीभाव मिळविण्याच्या दृष्टिकोनातून भौगोलिक चिन्हांकन नोंदणीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यातील एकूण २० वैविध्यपूर्ण फळे व भाजीपाला पिकांकरिता भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालय, चेन्नई यांच्यातर्फे भौगोलिक चिन्हांकन दर्जा प्राप्त झाला आहे.

१. महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी २. नाशिकची द्राक्ष ३. नागपूरची संत्री ४. लासलगावचा कांदा ५.जळगावचे भरीत वांगी ६. सासवडचे अंजीर ७. सोलापूरचे डाळिंब ८. सांगलीचा बेदाणा ९. जालन्याची मोसंबी १०. बीडचे सीताफळ ११. वेंगुर्ल्याचा काजू १२. घोलवडचे चिकू १३. जळगावची केळी १४. मराठवाडा केसर आंबा १५. कोकणचा हापूस आंबा १६. सांगलीची हळद १७. साताऱ्याचा वाघ्या घेवडा १८. रत्नागिरी व सिंधुदुर्गमधील कोकम १९. भिवापूरची मिरची २०. वायगावची हळद

राज्यातील फळे व भाजीपाला उत्पादनांना भौगोलिक मानांकन मिळाले आहे, त्यांच्यासाठी जागतिक बाजारपेठेत विशेष संधी निर्माण झाली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वतंत्र ब्रँड तयार करण्याची संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे भौगोलिक मानांकनाचा फायदा घेऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या उत्पादनांना अधिकाधिक मूल्य प्राप्त करून घेण्यासाठी भौगोलिक चिन्हांकन प्राप्त कार्यक्षेत्रातील संबंधित पीक उत्पादकांना अधिकृत वापरासाठी नोंदणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दै. "अॅग्रोवन" दि. १५/७/२०२१.

# वडगाव पानमध्ये सुरू झाला फ्लॉवर खरेदीचा स्वतंत्र बाजार

**नगर :** अकोले, संगमनेरसह अन्य भागात फ्लॉवर खरेदी-विक्रीसाठी संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीने वडगाव पान (ता. संगमनेर) येथे फ्लॉवर खरेदीसाठी स्वतंत्र बाजार सुरू केला आहे. रविवारी (ता. ११) महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते या बाजाराचा तसेच अंतर्गत रस्त्याच्या कामाचा प्रारंभ झाला.

संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, कोपरगावातही फ्लॉवरचे क्षेत्र आहे. प्रवरा, गोदावरी नदीकाठी फ्लॉवरचे अधिक उत्पादन घेतले जात असताना व संगमनेर तालुक्यात दररोज साधारण तीनशे टनांपेक्षा अधिक फ्लॉवरची उलाढाल होत असताना संगमनेरमध्ये फ्लॉवर खरेदी-विक्रीसाठी स्वतंत्र बाजार नव्हता. त्यामुळे समनापूर फाट्यावर खरेदी विक्री होत होती. मात्र त्यावर बाजार समितीचे नियंत्रण नव्हते. शेतकऱ्यांची अडचण पाहून संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीने वडगाव पान येथे फ्लॉवर बाजार सुरू केला आहे. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते प्रारंभ झाला.

सभापती शंकर खेमनर, बाजीराव खेमनर, नगराध्यक्ष दुर्गा तांबे, महानंदचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख, अॅड. माधव कानवडे, सुनंदा जोर्वेकर, रामहरी कातोरे, डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार अमोल निकम, गटविकास अधिकारी सुरेश शिंदे, बांधकाम विभागाचे आर. आर. पाटील, सरपंच श्रीनाथ थोरात, सचिव सतीश गुंजाळ उपस्थित होते. बाजार समितीचे वडगाव पान, आश्वी, साकूर, निमोन, घारगाव येथे उपबाजार कार्यरत आहेत.



**नगर : वडगाव पान (ता. संगमनेर) महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते बाजार समितीच्या फ्लॉवर खरेदी वजन काट्याचा प्रारंभ झाला.**

दै. "अॅग्रोवन" दि. २५/७/२०२१.

# भौगोलिक चिन्हांकन नोंदणीचे फायदे

गोविंद हांडे

**भौगोलिक मानांकन पिकांची नोंदणी करण्याकरिता तसेच प्रचार व प्रसिद्धी, विक्री व निर्यातीकरिता महाराष्ट्र, राज्य कृषी पणन मंडळामार्फत राबविण्यात योजना राबविण्यात येत आहे.**

भाग : २

भौगोलिक चिन्हांकनाच्या अधिकृत वापरा-साठी प्रमाणपत्र मिळविण्याकरिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालयामार्फत अर्जाची छाननी केली जाते.छाननीत काही त्रुटी आढळून आल्यास त्या त्रुटीची पूर्तता करण्याकरिता संबंधित अर्जदार किंवा ज्या संस्थेमार्फत अर्ज प्राप्त झाला आहे त्यांना लेखी कळविण्यात येते.

छाननीमध्ये जर अर्ज पूर्ण आढळून आल्यास त्या अर्जाची नोंद करून या अर्जात एक युनिक नंबर दिला जातो. त्याची नोंद सदर संस्थेच्या वेबसाइटवर केली जाते. सर्वसाधारणपणे अधिकृत वापराकरिता नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागतो. अधिकृत वापराकरिता नोंदणी प्रमाणपत्र दहा वर्षांसाठी ज्या शेतकऱ्यांने अर्ज केला आहे त्या शेतकऱ्याच्या नावाने दिला जातो. त्याची नोंद सदर संस्थेच्या वेबसाइटवर घेतली जाते.

## अधिकृत वापर करता नोंदणीचे फायदे

- भौगोलिक चिन्हांकन मानांकित नोंदणीकृत पिकाचे अधिकृत वापराकरिता म्हणून ओळख होते.
- नोंदणी केल्यामुळे जीआय चा लोगो वापरून विक्री करता येते. आपल्या पिकाची वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्माची ओळख निर्माण करून विक्री करण्यास मदत होते.
- जीआय चा अधिकृत लोगो वापरून विक्री केल्यामुळे प्रीमियम किंमत मिळते.
- जीआय मानांकित पिकाची निर्यातदारामार्फत निर्यात करता येते किंवा स्वतः निर्यात करता येते.
- रजिस्टार, जिऑग्राफिकल इंडिकेशन रजिस्ट्री ऑफिस, इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी इंडिया बिल्डिंग ,जीएसटी रोड, चेन्नई, पीन- ६००० ३२. अधिकृत वापराकरिता नोंदणी करण्यासाठी वैध प्रपत्रातील अर्ज व त्यासोबत निर्धारित केलेली योग्य ती सर्व कागदपत्र जोडून सदरचा प्रस्ताव नमूद केलेल्या पत्त्यावर कुरिअर किंवा स्पीड पोस्ट द्वारे पाठवावा लागतो.

## कृषी विभाग, पणन मंडळाची योजना

- भौगोलिक चिन्हांकन (जीआय) नोंदणीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. भौगोलिक मानांकन पिकांची नोंदणी करण्याकरिता तसेच नोंदणीकृत भौगोलिक चिन्हांकनाचा पिकासाठी अधिकृत वापर करता यावा, शेतकऱ्यांची नोंदणी करण्याकरिता तसेच प्रचार व प्रसिद्धी, विक्री व निर्यातीकरिता महाराष्ट्र, राज्य कृषी पणन मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत संबंधित शेतकरी किंवा संबंधित संस्था यांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.
- कृषी निर्यात धोरणांतर्गत कृषिमाल निर्यातीला चालना देण्यासाठी भौगोलिक चिन्हांकन पिकाची नोंदणी व अधिकृत वापर करता म्हणून शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याकरिता कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व संबंधित पिकाचे भौगोलिक चिन्हांकन प्राप्त संस्थेच्या समन्वयाद्वारे अधिकृत वापर करता नोंदणीचे खास मोहीम राबवून कार्यवाही करण्यात येत आहे.
- २०२१ -२२ मध्ये अधिकृत वापराची नोंदणी करण्याकरिता खास मोहीम राबवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांची भौगोलिक मानांकन प्राप्त पिकांकरिता,अधिकृत वापराकरिता नोंदणी करावी. त्याचे ब्रँडिंगद्वारे स्थानिक बाजारपेठेबरोबरच जागतिक बाजारपेठेत निर्यात करण्याकरिता खास प्रयत्न करण्यात येत आहे.
- सध्या हापूस आंबा,घोलवड चिकू, सोलापूर डाळिंब, सासवड अंजीर, सांगली बेदाणा, रत्नागिरी काजू, जळगाव केळी या पिकांचे उत्पादन, विक्री आणि अधिकृत वापराकरिता काही शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. यंदाच्या वर्षी कोकण हापूस आणि घोलवड चिकू यांची जीआय लेबल लावून इंग्लंडमध्ये आणि जळगाव भागातील केळीची दुबईला निर्यात झाली.
- भौगोलिक चिन्हांकन वापरामुळे निर्यातीमध्ये अधिक प्रीमिअम किंमत मिळते. त्याचा फायदा जीआय मानांकित अधिकृत वापराकरिता शेतकऱ्यांना होतो. सर्व जीआय मानांकित पिकाच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आपले पीक / बागेची अधिकृत वापराकरिता नोंदणी करावी.

- गोविंद हांडे, ९४२३५७५९५६
(तांत्रिक सल्लागार (निर्यात) महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, कृषी आयुक्तालय, पुणे)

दै. "ॲग्रोवन" दि - ११/७/२०२१.

# बाजार समित्यांनी अनावश्यक खर्च कमी करावा : सोनी

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : फळे भाजीपाला नियमनमुक्ती, खासगी बाजार समित्यांसह थेट पणनचे आव्हान आणि कोरोनामुळे बाजार समित्यांमधील घटलेली उलाढाल आदी विविध कारणांनी बाजार समित्यांचे उत्पन्न घटले आहे. त्यामुळे बाजार समित्यांनी राजकीय कार्यक्रम, सभा, समारंभ, स्वागत कमानी, पुतळे आदी विविध कारणांवर होणारा अनावश्यक खर्च टाळावा, अशा सूचना पणन संचालक सतीश सोनी यांनी परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. तर हा खर्च करायचा झाल्यास लोकवर्गणीतून करण्यात यावा, असे देखील स्पष्ट केले आहे.

बाजार समित्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत बाजार शुल्क असून, त्यावर बाजार समित्यांचे व्यवस्थापन सुरू आहे. या व्यवस्थापनासाठी बाजार समित्यांना कोणतेही शासकीय अनुदान, अर्थसाह्य मिळत नाही. तर विविध विकासकामांसाठी बाजार समित्या राज्य कृषी पणन मंडळाकडून कर्ज घेत असते. हा सर्व आर्थिक भार बाजार समित्यांवर असताना, अनेक बाजार समित्या अनावश्यक खर्च करत असते. यामध्ये राजकीय कार्यक्रम, सभा, समारंभ, स्वागत कमानी, पुतळे उभारणी, अनावश्यक वाहन वापराचा समावेश आहे. फळे भाजीपाला नियमनमुक्तीमुळे शेतीमाल बाजार समित्यांमध्ये न आणता परस्पर विक्री होत आहे. त्यामुळे या व्यवहारांवर बाजार शुल्काद्वारे मिळणारे उत्पन्न कमी झाले आहे. तर थेट पणन, खासगी बाजार समित्यांची देखील वाढती संख्या बाजार समित्यांना स्पर्धा ठरत आहे. त्यामुळे बाजार समित्यांनी अनावश्यक खर्च टळून उत्पन्न वाढीवर भर देण्याची गरज आहे, अशा पणन संचालक सोनी यांनी दिल्या आहेत.

**पुणे बाजार समितीच्या उत्पन्नात १७ कोटींची घट**

कोरोना संकटात पुणे बाजार समितीमधील घटलेल्या फळे, कांदा, बटाटा आणि भाजीपाल्याच्या आवकेमुळे २०२०-२१ या आर्थिक वर्षात बाजार समितीच्या उत्पन्नात १७ कोटींची घट झाली आहे.

दै. पुढारी
दि. २२/७/२०२१.

# पणनच्या योजनेत एक लाख क्विंटल शेतमाल तारणात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेत कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडे १५ जुलैअखेर १ लाख २९४ क्विंटलइतका शेतमाल ठेवण्यात आला आहे. या शेतमालाची एकूण किंमत ३८ कोटी २० लाख रुपये आहे. त्यातील कर्ज मंजुरीची रक्कम २७ कोटी ५७ लाख रुपयांइतकी आहे. ३०६ पैकी ६१ बाजार समित्यांनी योजनेत सहभाग घेतला आहे.

राज्यात शेतमाल साठवणुकीच्या सुविधा नसल्यामुळे ऐन सुगीमध्ये शेतीमाल एकाच वेळी विक्रीस येऊन शेतमालाचे भाव खाली येऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे शेतमालाच्या काढणीनंतर काही कालावधीसाठी साठवणूक करून बाजारभावात वाढ झाल्यानंतर तो विक्रीसाठी आणावा व याचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा हा योजनेचा हेतू आहे. मंडळाच्या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना बाजार समिती अथवा वखार महामंडळाच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्क्यांपर्यंतची रक्कम ६ महिने कालावधीसाठी ६ टक्के व्याज दराने तारण कर्ज म्हणून देण्यात येते. योजनेत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफुल, चणा, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), काजू बी, बेदाणा, सुपारी व हळद इत्यादी शेतमालासाठी तारण कर्ज देण्यात येते.

> शेतमाल तारण कर्ज योजनेत चालू हंगाम २०२०-२१ मध्ये सोयाबीन या शेतमालास चांगला बाजारभाव मिळत असल्याने, तसेच भातासाठी राज्य सरकारने दिलेल्या बोनसमुळे शेतमाल तारण कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी झाली आहे. शेतकऱ्यांनी तारण योजनेत सोयाबीन ठेवताना क्विंटलला ३ हजार ४०० रुपये असणारा भाव माल विक्री करताना ७ हजार ५०० रुपयांपर्यंत वाढला आहे. त्यामुळे सहभागी शेतकऱ्यांना फायदा झाला आहे.
>
> **- सुनील पवार,**
> कार्यकारी संचालक,
> राज्य कृषी पणन मंडळ